

दैनिक

# अट्टल संकेत

ATTAL SANKET



Email : attalsanket2023@gmail.com

RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-३ ■ अंक-७१ ■ बुधवार, दि. ३० एप्रिल २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.3 ■ Issue -71 ■ Wednesday, ३० April 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-


## आंधळं प्रेम की जाळं? अहिल्यानगरमधून १३६ मुली अचानक बेपत्ता ?

**अहिल्यानगर : प्रेम आंधळं असतं असं म्हणतात. याचं आंधळ्या प्रेमाला सोशल मीडियामुळे आणखी बळ मिळते. तरुणाई या आंधळ्या प्रेमामुळे अनेकदा चुकीचे निर्णय घेताना दिसते. फेब्रुवारी ते मार्च असा महाविद्यालयीन, शाळांचा परीक्षेचा काळ असतो. याच काळात अहिल्यानगर येथील १३६ मुली बेपत्ता झाल्याचे उघडकीस आले आहे. या घटनेचा पोलीस अधिक तपास करत आहेत.**



अहिल्यानगर मध्ये मुली बेपत्ता असल्याचं प्रकरण दिवसेंदिवस वाढत आहे. त्याची कारणे वेगवेगळी असली तरी प्रेमसंबंध हे प्रमुख कारण आहे. मात्र, अशाच काही घटनांमधून अघटित घटना घडल्याची उदाहरणे समोर आहेत. गेल्या दोन ते तीन म हिन्यांचा आढावा घेतला तर तीन महिन्यांत सर्वाधिक मुली पळून गेल्या आहेत. जानेवारी, फेब्रुवारी, मार्च या महिन्यात दहावी, बारावीच्या परीक्षेचा काळ असतो. याच काळात नेमक्या मुली पळून गेल्या आहेत.

एका सर्वेक्षणामध्ये शाळकरी वयामध्ये एखाद्या म ुलाबरोबर प्रेम जडणे आणि त्यातून मुलांच्या आमिषाला बळी पडून म ुली पळून जाणे, सोशल मीडियाच्या माध्यमातून परराज्यातील एखाद्या मुलाबरोबर प्रेम जडणे, प्रेमाच्या आणाभाका घेणे, नंतर घरातून निघून जाणे असे साधारणपणे घडताना दिसते. कौटुंबिक आणि आर्थिक परिस्थिती ही कारणेदेखील त्यात समोर आली आहेत. गेल्या तीन महिन्यात जिल्ह्यातून १३६ मुली पळून गेल्या आहेत. त्यापैकी अवघ्या ७१ मुली सापडल्या आहेत. अन्य बेपत्ता मुलींचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. दरम्यान या घटनेने नगर हादरले आहे.

## गौतम अदानींना दिलासा! अमेरिकेतील लाचखोरी प्रकरणात मिळाली क्लीन चिट

नवी दिल्ली : भारताचे दिग्गज उद्योगपती गौतम अदानी यांच्यावर अमेरिकन न्यायालयाने लाचखोरी प्रकरणाबाबत दोषी ठरवले होते. याबाबत त्यांच्यावर कारवाई करण्यात आली असून अटक वॉरंट देखील जारी करण्यात आले होते. या प्रकरणामुळे अदानी समुहाला मोठ्या अडचनींचा सामना करावा लागला होता. मात्र आता अमेरिकेत सुरू असलेल्या लाचखोरी प्रकरणातआघाडीचे उद्योगपती अदानी ग्रुपचे अध्यक्ष गौतम अदानी यांची कंपनी अदानी ग्रीन एनर्जीला मोठा दिलासा मिळाला आहे.

अमेरिकेतील लाचखोरी प्रकरणाबाबत स्वतंत्र पुनरावलोकनात त्यांच्याविरुद्ध कोणतीही अनियमितता आढळली नसून, अदानी ग्रुपने सर्व आरोप निराधार असल्याचे म्हटले आहे. याबाबत कंपनीने एक निवेदन जारी केले आहे. त्यानुसार, 'स्वतंत्र चौकशीनंतर अदानी ग्रीन किंवा त्यांच्या सहयोगी कंपन्यांनी कोणत्याही नियमांचे किंवा कायद्यांचे उल्लंघन केले नसल्याचा निष्कर्ष काढण्यात आला आहे. त्याचबरोबर अदानी कंपनी भविष्यातही सर्व नियम आणि कायदे पाळत राहील', असेही म्हटले आहे.

नेमके प्रकरण काय?

भारतीय वीज प्रकल्पाचा करार मिळवण्यासाठी अधिकाऱ्यांना लाच दिल्याचा आरोपाखाली नोव्हेंबर २०२४ मध्ये अमेरिकन अधिकाऱ्यांनी अदानी सम ूहाचे प्रमुख गौतम अदानी, त्यांचा पुतण्या सागर अदानी आणि अदानी ग्रीनचे व्यवस्थापकीय संचालक विनीत एस. जैन यांना अटक केली होती. निधी उभारताना अमेरिकन गुंतवणूकदारांची दिशाभूल केल्याचाही त्यांच्यावर आरोप होता. या आरोपांअंतर्गत, अदानी ग्रुपवर २३६ दशलक्ष डॉलर्सची लाच दिल्याचा आरोप होता. दरम्यान, या प्रकरणाचा अदानी समुहाचे शेअरर्स धडाधड कोसळले असून केनियाने अदानींशी संबंधित प्रकल्प रद्द करण्याची घोषणा केली होती. त्यामुळे अदानी समूहाला मोठा फटका बसला होता.

## लष्कराने कारवाईची वेळ आणि टार्गेट ठरवावे, पंतप्रधान नरेंद्र मोदीचे आदेश

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**



पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर संपूर्ण देशातून दहशतवाद्यांना पोसणाऱ्या पाकिस्तानवर कारवाईची मागणी केली जात आहे. यातच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि तिन्ही दलांच्यां अध्यक्षांसह उच्चस्तरीय बैठक घेतली. या बैछकीत सीडीएस अनिल चौहान आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवालही सहभागी होते.

**पंतप्रधान मोदींनी लष्कराला दिली सूट**

सूत्रांच्या माहितीनुसार ही बैठक सुमारे अडीच तास सुरू होती. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. पंतप्रधान मोदींनी लष्कराला पूर्णपणे सूट दिली आहे. ते म्हणाले, दहशतवादाला उत्तर देणे आमचा दृढ राष्ट्रीय संकल्प आहे. त्यांनी यावेळेस भारतीय सैन्य दलाच्या क्षमतांवर पूर्ण विश्वास व्यक्त केला.

पंतप्रधान मोदी म्हणाले, आमची प्रत्युत्तर कारवाईची पद्धत काय आहे, टार्गेट्स काय असतील आणि याची योग्य वेळ काय असेल या प्रकारचे ऑपरेशन निर्णय घेण्यासाठी सैन्य दलाला संपूर्ण सूट देण्यात आली आहे. प

हलगाम येथील बैसरन खोऱ्यात दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ पर्यटकांना आपला नाहक जीव गमवावा लागला होता. यावेळेस पंतप्रधानांनी या हल्ल्याचा कट रचणारे तसेच दहशतवाद्यांवर कडक कारवाई करणार असल्याचे म्हटले होते.

## १ मे पासून एटीएममधून पैसे काढणं महागणार; आरबीआयचा नवा निर्णय!

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

आरबीआयकडून सातत्याने बँक व्यवहारांबाबत नियमावलीत बदल केले जातात. अशातच आता मे महिना सुरु होण्यास एक दिवस शिल्लक राहिला असून आरबीआयने बँकिंगबाबत नवी नियमावली जाहीर केली आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ने एटीएममधून पैसे काढण्याच्या नियमांमध्ये काही बदल केले आहेत. त्यानुसार एटीएममधून पैसे काढणं महाग होणार आहे. त्यामुळे वारंवार पैसे काढणाऱ्यांचे मोठे नुकसान होणार असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

आतापर्यंत प्रत्येक बँकेकडून ग्राहकांना एका विशिष्ट मर्यादेपर्यंत एटीएममधून पैसे काढण्याची मोफत सुविधा दिली जात होती. परंतु आता मर्यादेपलिकडे वापरली जाणारी एटीएम सुविधाबाबत आरबीआयने विशेष लक्ष दिले आहे. या नियमांमध्ये बदल करुन एटीएम वापरण्यावर आकारल्या जाणाऱ्या शुल्काबाबत पारदर्शकता आणण्यासाठी आरबीआयने एटीएमम धून पैसे काढण्यावर शुल्कवाढ केली आहे. यापूर्वी प्रत्येक एटीएम व्यवहारावर प्रति व्यवहार २१ रुपये शुल्क आकारले जात होते. आता नव्या नियमानुसार एटीएम व्यवहारावर प्रति व्यवहार कमाल २३ रुपये शुल्क आकारले जाणार आहेत. हे नवीन नियम १ मे २०२५ पासून देशभरात लागू केले जाणार आहेत.

मोफत व्यवहार मर्यादेत बदल नाही

एटीएममधून ग्राहक दरमहा पाचवेळा मोफत व्यवहार करू शकतात. या मर्यादेबाबत कोणताही बदल करण्यात आलेला नाही. मात्र ग्राहकांनी ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा अधिक वेळेला पैसे काढल्यास नवीन शुल्क लागू होणार आहे. काही बँकांनी जास्तीत जास्त व्यवहारांमध्ये सवलत दिली आहे. यामध्ये एचडीएफसी बँक देखील समाविष्ट आहे. एचडीएफसी बँकेच्या ग्राहकांना फक्त एचडीएफसी एटीएममधून पैसे काढतानाच शुल्क आकारले जाईल. शिल्लक तपासणे, मिनी स्टेटमेंट काढणे आणि पिन बदलणे मोफत असेल. तर दुसऱ्या बँकेच्या एटीएममधून पैसे काढले तर पैसे काढण्याव्यतिरिक्त, तुमच्याकडून बॅलन्स तपासणे, मिनी स्टेटमेंट काढणे आणि पिन बदलणे यासाठी देखील शुल्क आकारले जाईल.

## गौतम अदानींना दिलासा! अमेरिकेतील लाचखोरी प्रकरणात मिळाली क्लीन चिट

नवी दिल्ली : भारताचे दिग्गज उद्योगपती गौतम अदानी (ऋरींरा अवरपळ) यांच्यावर अमेरिकन न्यायालयाने लाचखोरी प्रकरणाबाबत दोषी ठरवले होते. याबाबत त्यांच्यावर कारवाई करण्यात आली असून अटक वॉरंट देखील जारी करण्यात आले होते. या प्रकरणामुळे अदानी समुहाला मोठ्या अडचनींचा सामना करावा लागला होता. मात्र आता अमेरिकेत सुरू असलेल्या लाचखोरी प्रकरणात (णड लीळलशी लरीश) आघाडीचे उद्योगपती अदानी ग्रुपचे अध्यक्ष गौतम अदानी यांची कंपनी अदानी ग्रीन एनर्जीला मोठा दिलासा मिळाला आहे.

अमेरिकेतील लाचखोरी प्रकरणाबाबत स्वतंत्र पुनरावलोकनात त्यांच्याविरुद्ध कोणतीही अनियमितता आढळली नसून, अदानी ग्रुपने सर्व आरोप निराधार असल्याचे म्हटले आहे. याबाबत कंपनीने एक निवेदन जारी केले आहे. त्यानुसार, 'स्वतंत्र चौकशीनंतर अदानी ग्रीन किंवा त्यांच्या सहयोगी कंपन्यांनी कोणत्याही नियमांचे किंवा कायद्यांचे उल्लंघन केले नसल्याचा निष्कर्ष काढण्यात आला आहे.

## 'पहलगाम हल्ल्यातील मृतांच्या नातलगांना ५० लाखांची मदत देणार'

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**



पहलगाम हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या महाराष्ट्रातील मृतांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ५० लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली. राज्य सरकार या कुटुंबांच्या शिक्षण आणि रोजगाराच्या गरजांवरही लक्ष केंद्रित करेल. जगदाळे कुटुंबातील मुलीला सरकारी नोकरी दिली जाई; असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या अतिरेकी हल्ल्यात महाराष्ट्रातील सहा जणांचा मृत्यू झाला होता. यात डोंबिवलीच्या तीन, पुण्याच्या दोन आणि पनवेलच्या एका नागरिकाचा समावेश होता. या सहा जणांच्या कुटुंबियांना ५० लाख रुपयांची आर्थिक मदत देत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले.मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत मंत्रिमंडळाची बैठक झाली. यानंतर राज्यातील सहा मृतांच्या कुटुंबियांना ५० लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर करण्यात आली. पहलगाम हल्ल्यात मृत्युमुखी पडलेले महाराष्ट्रातील सहा जण- अतुल मोने (डोंबिवली), संजय लेले (डोंबिवली), हेमंत जोशी (डोंबिवली), संतोष जगदाळे (पुणे), कौस्तुभ गणबोटे (पुणे), दिलीप देसले, (पनवेल)

## अखिल भारतीय बळीराजा संघटनेच्या वतीने शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांचे निवेदन



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

अखिल भारतीय बळीराजा संघटनेच्या वतीने छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. आंदोलन संपल्यानंतर विभागीय आयुक्त दिलीप गावंडे यांना निवेदन सादर करण्यात आले. याप्रसंगी बळीराजा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष निवृत्ती डक पाटील, प्रदेशाध्यक्ष शिवाजीराव साळुंके, प्रदेश उपाध्यक्ष जी. के. गाडेकर, मराठवाडा अध्यक्ष प्रभाकर भुसारे, महिला प्रदेशाध्यक्षा अनिता पाटील, मराठवाडा महिला अध्यक्षा सुमित्रा गावंडे, शोभा वाकळे, छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष आबासाहेब भोसले पाटील आदींसह संघटनेचे अनेक पदाधिकारी सहभागी झाले होते.

## गुटखा विक्री करणाऱ्या होलसेल व रिटेलर, डिलर यांच्यावर कडक कारवाई करा

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

**महाराष्ट्र वाहतूक सेनेचे जिल्हाप्रमुख सलीम खामगावकर यांची मागणी**




शहरात व वाळुज महानगर भागात गुटखा विक्री रासरोजपणे करण्यात येत आहे. बऱ्याच वेळा गुटखा विक्रीला आळा घालण्यासाठी कार्यवाही, धाडी टाकण्यात येते पण छोटे-मोठे दुकानदार टपरी चालक यांनाच लक्ष करुन गुन्हे दाखल करण्यात येतात. परंतु मोठे व्यावसायिक होलसेलर किंवा डिलर यांच्यावर कोणतीही कार्यवाही करण्यात येत नाही. यामुळे लहान-लहान व्यापाऱ्यांमध्ये, जनतेमध्ये रोष व शंका निर्माण होत आहे. सदर अन्यायाबाबत संदर्भीय पत्रान्वये वारंवार निवेदन महाराष्ट्र वाहतूक सेनेने केले आहे. मात्र अद्याप याबाबत कुठल्याही प्रकारे कारवाई झालेली नाही, तरी आपण याबाबत सखोल चौकशीचे आदेश देऊन १५ दिवसांत कारवाई करुन महाराष्ट्र वाहतुक सेनेला अहवाल देण्यात यावा. अन्यथा लोकशाही मार्गाने गुटखा विरोधात जनआंदोलन छेडण्यात येईल व याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या प्रशासनाची राहील याची नोंद घ्यावी, असे आवाहन महाराष्ट्र वाहतूक सेनेचे जिल्हाप्रमुख सलीम खामगावकर यांनी केले आहे.

मोठे डिलर, मोठे होलसेलर यांना कोणाच्या आशिर्वादाने, वरदहस्तामुळे सूट देण्यात येत आहे? एक-दोन पुड्याची विक्री करुन २००-३०० रुपये कमावणाऱ्या व्यावसायिकांवर टार्गेट करुन कार्यवाही करण्यात येत आहे. यातुन उदरनिर्वाहाचे साधन असलेल्या या छोट्या व्यवसायीकांना आणखी आर्थिक अडचणीला समोर जाऊन उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होत आहे. अशा प्रकारे त्यांच्यावर अन्याय होत आहे.

दि. १४ मार्च २०२५ धुलिवंदन, सुट्टीच्या दिवशी वाळूज गाव पोलिस स्टेशन यांच्या हद्दीत कारवाई करुन गुन्हा दाखल न करता वाळूज एमायडीसी पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला. यावेळी संबंधित सर्व कर्मचारी अधिकारी व वरिष्ठ अधिकारी यांच्या चौकशीचे अहवाल देण्यात यावा, अशी मागणीही सलीम खामगावकर यांनी केली.

## संपादकीय

# महात्मा बसवेश्वर: सामाजिक समतेचे आद्य प्रवर्तक

महामानव, विश्वगुरू, परिवर्तनवादी सत्पुरुष, लिंगायत धर्म संस्थापक, सामाजिक समतेचे आद्य प्रवर्तक, थोर समाजसुधारक, वर्गविरहित समाज निर्माता जगद्ज्योती महात्मा बसवेश्वर यांचे १२ व्या शतकात आध्यात्मिक, वैचारिक व सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यात मोठं योगदान आहे. बसवण्णा यांचा जन्म विजापूर जिल्ह्यातील बागेवाडी येथे सन ११३१ मध्ये वैशाख महिन्याच्या तिसऱ्या दिवशी म्हणजेच अक्षय्य तृतीयेच्या मंगलमय दिनी झाला, अनब जणू काही सामाजिक समतेचा सूर्यच उदयास आला.

म. बसवेश्वर हे वीरशैव लिंगायत धर्माचे संस्थापक व धर्मगुरू होते. थोर संत, महान कवी अनब सच्चे समाजसुधारक म्हणून त्यांची जनमानसात ख्याती होती. त्यांनी निर्गुण, निराकार, एकेश्वरवादी श्रद्धेचा पुरस्कार केला. बसवेश्वरांच्या आईचे नाव मादलांबिके तर वडिलांचे मादिराज. म. बसवेश्वरांच्या कालखंडात समाजामध्ये सर्वत्र कर्मकांड, दांभिकता, स्त्री-पुरुष असमानता, स्त्री दास्यत्व, वर्णभेद, जातीभेद या कुप्रथांचा बोलबाला होता. अशा मनुवादीप्रवृत्तीत जखडलेल्या कर्मकांडी समाजाला थेट आव्हान करत म. बसवेश्वरांनी वयाच्या ८ व्या वर्षी उपनयन संस्कारचे जानवे तोडून आपल्या मुंज विधीला नकार दिला. परिणामी म. बसवेश्वरांना आपल्या घराचा त्याग करावा लागला. मानवा-मानवात भेदाभेद करून जातीयता निर्माण करणं सामाजिक एकात्मतेला मारक आहे, असे त्यांचे ठाम मत होते. मनात भक्तिभाव बाळगा. कर्मकांड करू नका. कष्टकऱ्यांना कमी लेखू नका, हा मोलाचा उपदेश त्यांनी लोकांना दिला. म. बसवेश्वरांनी जातीपातीच्या भिंती गाडून चातुर्वर्ण्याला कडाडून विरोध करत, लिंगायत धर्माचा प्रचार करून सामाजिक समता प्रस्थापित केली.

उल्लेखनीय गोष्ट म्हणजे म. बसवेश्वरांनी लहानपणीच कर्मकांडी प्रवृत्तींविरुद्ध दंड थोपटले. कृष्णा व मलप्रभा या नद्यांच्या संगमावरील कुडलसंगम (जि.विजापूर) येथील अध्ययन केंद्रात ते दाखल झाले. तेथे त्यांनी १२ वर्षे वास्तव्य करून विभिन्न भाषा, धर्म, तत्त्वज्ञान आदी तत्सम गोष्टींचा सखोल अभ्यास केला. याशिवाय त्यांनी यज्ञविधीत पशूबळी देणं या अपप्रवृत्तीलाही कडाडून विरोध केला. भूतदया हा त्यांच्या व्यक्तिमत्वातील स्थायीभाव होता. दरम्यान मादूलांबा (मादंबा) नामक मामाच्या मुलीशी त्यांचा विवाह झाल्यावर त्यांनी सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा येथे सुमारे २१ वर्षे वास्तव्य केले, अनब तेथूनच म. बसवेश्वर यांनी वीरशैव लिंगायत धर्माचा आध्यात्मिक पाया रचला. शक्ती विशेषाद्वैत तत्त्वज्ञान मांडून म. बसवेश्वरांनी वर्गविरहित समाज निर्माण करण्यात आपलं सारं आयुष्य पणाला लावलं.

अंधश्रद्धा ही समाजाला लागलेली कीड आहे. त्यातून समाज अधोगतीच्या मार्गावर जातो, हा विचार म. बसवेश्वरांनी रयतेला दिला. या पार्श्वभूमीवरच त्यांनी तत्कालिन जुनाट रूढी- प्रथांविरुद्ध आपली भूमिका परखडपणे मांडली. त्याजागी ज्ञान-भक्ती-कर्म या त्रिसूत्रीचा अंगिकार करून कर्मकांड, अंधविश्वास, जातीभेदाविरुद्ध जनमत उभे केले. सत्य, अहिंसा, दया, सदाचार, शील या सद्गुणांचा अंगिकार करा. भूतदया बाळगा. जातीपातीवर विश्वास न ठेवता इतरांबद्दल सदभावना ठेवा, आत्मस्तुती करू नका. दुसऱ्यांची निंदा नालस्ती करू नका. खोटे बोलू नका. चोरी करू नका. हत्या करू नका, परोपकारी व्हा म्हणजे हीच खरी अंतरंगशुद्धी व बाह्यशुद्धी आहे. ही तत्वे त्यांनी लिंगायत धर्मात बिंबवली. तत्कालिन समाजातील प्रचलित उच्च - नीचता, स्त्री दास्यत्व, स्त्री-पुरुष असमानता या अनिष्ट चालीरितींविरुद्ध वाचा फफोडून बसवेश्वर हे चातुर्वर्ण्य व्यवस्थेविरुद्ध सर्व शक्तीनिशी उभे राहिले. जातीच्या आधारावर भेदभाव करू नका. इतरांवर विसंबून न रहाता, आत्मनिर्भर होऊन स्वत:च्या भाकरीसाठी स्वतः कष्ट करायचं, हा संदेश त्यांनी रयतेला दिला. तात्पर्य, श्रमाशिवाय पर्याय नाही, असा संदेश त्यांनी लोकांना दिला. प्रत्येकाने आत्मनिर्भर होणे आवश्यक आहे, हा उपदेश त्यांना सर्व जातीतल्या लोकांना दिला.कायकवे कैलास म्हणजे कर्म करण्यातच स्वर्ग आहे, हा विचार त्यांनी समाजाला दिला. कोणतेही काम कमी प्रतीचे वा उच्च प्रतीचे नसते. कुठलीही जात श्रेष्ठ वा कनिष्ठ नसते. सर्व मानव समान आहेत, हा उपदेश त्यांनी सर्वजातीय लोकांना दिला. बसवण्णा यांनी वैदिक धर्म त्यागून लिंगायत धर्म स्वीकारला.

वेदशास्त्र, होम-हवन, मूर्ती पूजा, उपास-तापास, पशूबळी, पुनर्जन्म यांना त्यांनी कडाडून विरोध केला. देव दगडात नव्हे, तर तुमच्या अंतर्मनात आहे. अठरा पगड जातीतील लोकांना सोबत घेवून त्यांनी लिंगायत धर्माची स्थापना केली. लिंगायत धर्माचे सदस्य हे आपल्या गळ्यात इष्टलिंग धारण करतात. हे लिंग शिवाचे म्हणजेच सत्याचे आहे, अशी त्यांची भावना आहे. पूजा करताना ते या लिंगाला आपल्या तळहातावर ठेवून प्रार्थना करतात. स्त्री-पुरुष, गरीब-श्रीमंत, स्पृश्य-अस्पृश्य या सर्वांना समान दर्जा व अधिकार हाच लिंगायत धर्माचा मूलाधार आहे. अशा सामाजिक सुधारणा केल्यानेच त्यांना गुरुदेव, संत, समाजसुधारक म्हटलं जातं.

भारतातील लिंगायत समाज म. बसवेश्वरांना देवाचा अवतार मानतात. स्त्री दास्यत्व नाहिसे करून सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने त्यांनी शिवानुभव मंटप/अनुभव मंटप संस्थेची स्थापना केली अनब त्यात सर्व जाती-धर्मातील लोकांना प्रतिनिधित्व दिले. या संस्थेत ब्राह्मण मधूवय्या, चांभार हरळय्या, ढोर कक्कय्या, नावाडी चौड्या, सुतार बसप्पा, मांग चन्नया, न्हावी आप्पांना, सोनार किन्नरी ब्रह्मय्या, गुराखी रामण्णा, दोरखंड करणारा चंद्या, पारधी संगय्या आदींचा समावेश होता. महत्त्वाचे म्हणजे बसवेश्वर यांनी सवर्ण आणि कनिष्ठ जातीतील मुला-मुलींचे विवाह लावून दिले. त्यातून आंतरजातीय विवाहास चालना दिली. वास्तविक, सामाजिक समतेच्या पायावर नवसमाजाची निर्मिती करण्यासाठी सर्व जाती-धर्मातील लोकांना प्रतिनिधित्व देणं, हे खरं तर, आदर्श लोकशाहीचं द्योतक आहे, असे म्हणणे संयुक्तिक ठरेल. वास्तवात हेच त्यांच्या सर्वधर्मसमभावाचे प्रतिक होय. कर्नाटकात सर्वाधिक लिंगायत समाज असून सोबतच आंध्र, तामिळनाडू, महाराष्ट्रात देखिल लिंगायत समाजबांधवांचे वास्तव्य आहे. १२ व्या शतकात म. बसवेश्वरांनी सुरू केलेलं सामाजिक समतेचं कार्य १९ व २० शतकात फफुले-शाहू-आंबेडकर यांनी पुढे नेलं. त्याची परिणती म्हणजे तत्कालिन समाजातील जुनाट रूढी परंपरा, प्रथा, अंधश्रद्धा नष्ट होऊन त्याजागी स्त्री-पुरुष समानता, समान संधी समान अधिकार, धार्मिक सहिष्णुता, जातीय सलोखा प्रस्थापित झाला. अनब सर्व जाती-धर्माचे नागरिक गुण्या - गोविंदाने नांदू लागले आहेत. सामाजिक समतेचे पुरस्कर्ते म. बसवेश्वर यांच्या संकल्पनेतील स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित होणं म्हणजे हेच खरे त्यांना अभिवादन ठरेल.

# मानव कल्याणासाठी बसवेश्वर महाराजांच्या कार्याचे अनुकरण आवश्यक

बसवेश्वर महाराजांना कोणत्याही प्रकारचा लोभ नसल्यामुळे न्याय प्रीय राजा होते.बसवेश्वर महाराज हे बसव,बसवण्णा इत्यादी नावाने ओळखले जात असले तरीही थोर समाजसुधारक म्हणून त्यांची मोठी ख्याती होती.त्यामुळे त्यांचे कार्य आजही तेवढेच महत्त्वाचे व गरजेचे आहे.इ.स.११०५ ते ११६५या कालखंडात होऊन गेलेले कर्नाटकातील संत व समाजसुधारक होते.त्यांनी नेहमी निर्गुण व निराकार एकेश्वरवाद श्रध्देचा पुरस्कार केला.



कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील इंगळेश्वर-बागेवाडी या गावात ११०५ साली वीरशैव कुटुंबात बसवेश्वर महाराजांचा जन्म झाला. मुख्यत्वेकरून त्यांचा जन्म अक्षतृतीयेला झाला.अक्षतृतीया हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक व महत्वाचा दिवस मानल्या जातो. त्यामुळे या दिवसाला शुभ मानण्यात येते. बसवेश्वर महाराज कर्मठ विधीचा विरोध करायचे अशा परिस्थितीत मुंजीचा विरोध करून मला आधीच लिंगदीक्षा मिळाली आहे असे सांगत वयाच्या ८ व्या वर्षी घर सोडून ते कूडलसंगम येथे निघून गेले.कृष्णा व मलप्रभा या नद्यांच्या संगमावरील कुडलसंगम येथे मोठे अध्ययन केंद्र होते.तेथे बसवेश्वरांनी १२ वर्षे वास्तव्य केले.कुडलसंगम येथे त्यांनी वेगवेगळ्या भाषा,धर्म, तत्वज्ञान इत्यादींचा प्रगल्भ अभ्यास केला.त्यांचा विवाह मामाच्या मुलीशी झाला व त्यानंतर सोलापूरातील मंगळवेढा येथे आले. बसवेश्वरांनी मंगळवेढा येथे लोकशाही संसद स्थापन केली.या संसद मंडपात सर्व धर्मातील लोक एकत्र येऊन सामाजिक अडचणींवर कशी मात करायची यावर चर्चा करून व योग्य निर्णय घेवून पुढील कार्य होत असे. बसवेश्वर यांचे एकच उद्दिष्ट होते ते म्हणजे समाजातील वाईट चालीरितीचा विरोध करून समाजाच्या हिताच्या गोष्टींची अंमलबजावणी करण्याकडे जास्त महत्त्व देत असे. १२ व्या शतकातील आदर्श,समतेचे, जनकल्याणाकारी प्रणेते म्हणून बसवेश्वर महाराज ओळखले जायचे.त्यामुळेच १२ व्या शतकापासून खऱ्या अर्थाने लोकशाहीला सुरूवात झाल्याचे सांगण्यात येते. कारण लोकशाहीमध्ये समता, मुल्य, न्याय, बंधूंता,एकात्मता, संपूर्ण स्वतंत्र, अधिकार,नियम, नियंत्रण, शिस्त,सूशासन व योग्य प्रशासन यामुळे समाज व देश घडण्यास मोठी मदत मिळते. बसवेश्वर महाराजांच्या संसदेत जातीभेला बीलकुलच थारा नव्हता. त्यामुळे त्यांना समाजाला एकत्र बांधण्यास मोठी मदत मिळाली. कारण कोणत्याही प्रकारचा भेदभाव ते कदापि सहन करत नसे. आपल्याला २१ व्या शतकात जे कायदे दिसतात त्यात बसवेश्वर महाराजांचा सिंहांचा वाटा आहे.बसवेश्वर महाराजांना साक्षात नंदीचा अवतार मानल्या जाते.आपण ज्याला शंकरजीच वाहन म्हणतो.भगवान शंभर या पृथ्वीचा,मानव, पशुपक्षी व जीवजंतू यांचा पालनहार आहे. त्यांच्या सोबत नंदी म्हणजे साक्षात परमेश्वर बसवेश्वर महाराज म्हणजे ही दैवी लीलाच म्हणावी लागेल. कृष्णा आणि मलापहारी नद्यांच्या संगमावर असलेल्या गुरूकुलात ज्ञानी गुरूजनांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी शिक्षण घेतले. विविध ग्रंथांचा, ज्ञानाच्या सर्व शाखांचा अभ्यास केला. त्यामुळेच त्यांनी संस्कृत ग्रंथातील धर्मतत्वे कन्नडमधुन लिहिली.बसवेश्वर महाराजांनी नेहमी आध्यात्मिक जीवन व समाज घडवीण्याच्या चालीरीतीचे मार्गदर्शन नेहमीच करीत असे. कर्नाटक व दक्षिण महाराष्ट्रात आपल्याला लोकांच्या जिभेवर आजही बसवेश्वरांची वचने आरूढ झाल्याचे दिसून येते. सत्ता वैभव आणि कीर्ती याला यत्किंचितही वाव न देता आध्यात्मिक व नितिमुल्याला प्रथम प्राधान्य देवून समाज हितासाठी अहोरात्र प्रयत्न केले. बसवेश्वरांच्या काळात समाजव्यवस्थेत स्त्रीयांना शुद्र, बहिष्कृत समजले जायचे. त्यांना स्त्रीयांवर होत असलेला अत्याचार सहन झाला नाही. याकरीता त्यांनी या विरूद्ध मोठा लढा उभारून मोठे भरीव कार्य केल्याचे दिसून येते.

तत्कालीन समाजव्यवस्थेला व राजसत्तेला हादरवून टाकणारा आंतरजातीय विवाह महात्मा बसवेश्वरांच्या पुढाकाराने १२ व्या शतकात घडला.त्यामुळे बसवेश्वर महाराजांचे प्रत्येक कार्य व त्यांची जीवनशैली आज समाजाला प्रेरणादायी ठरू शकते व ठरत आहे.आज देशातील राजकीय पुढाऱ्यांनी बसवेश्वर महाराजांचे आदर्श सामोरं ठेऊन समाज हितांचे व देश हिताचे कार्य करण्याची नितांत गरज आहे.राजकीय पुढाऱ्यांनी बसवेश्वर महाराजांचे अनुकरण करून भ्रष्टाचार व वाजवीपेक्षा जास्त असलेली चल-अचल संपत्तीचा त्याग करून सरकारी तिजोरीत जमा करावी किंवा जनकल्याणासाठी उपयोगात आणली पाहिजे व महात्मा बसवेश्वरांचे आदर्श सामोरं ठेऊन समाजकार्य केले तरच खऱ्या अर्थाने राजकीय पुढाऱ्यांमार्फत बसवेश्वर महाराजांची जयंती साजरी झाली असे गृहीत धरले जाईल.कारण राजकीय पुढाऱ्यांजवळ समाजसेवक, लोकप्रतिनिधी,जनप्रतिनिधी अशी मोठी जबाबदारीची आणि नामांकित पदे आहेत.त्याचा उपयोग समाज घडविण्यासाठी व्हायलाच हवा.बसवेश्वर महाराजांजवळ कोणतेही पद नसताना समाज हितासाठी अहोरात्र कार्य केले.कारण ते त्यागी, निष्ठावान,महान समाजसेवक व समाजसुधारक होते. त्यांचे अनुकरण करून आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी कार्य करण्याची नितांत गरज आहे.वैशाख शुद्ध तृतीया म्हणजे अक्षय्य तृतीया यांच दिवशी महात्मा बसवेश्वरांचा जन्म झाला.त्याचप्रमाणे याच दिवशी पराक्रमी भगवान परशुराम यांचाही जन्म झाला हा एक संयोगच म्हणावा लागेल. अक्षय्य तृतीया या शुभ मुहूर्ताचे औचित्य साधून, महात्मा बसवेश्वर आणि भगवान परशुराम यांच्या जयंतीचे शुभ संकेत लक्षात घेता या भारत भुमित आजच्या दिवशी प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावुन आगळावेगळा ऐतिहासिक उपक्रम राबवुन पृथ्वीला वाचविण्याचा संकल्प संपूर्ण मानवजातीने करायला हवा.कारण मानवजातीच्या कल्याणासाठी आज तीन दैवी शक्ती एकत्र विराजमान आहेत.त्यामुळे तीन दैवी शक्तीचा (अक्षय्य तृतीया, बसवेश्वर जयंती,परशुराम जयंती) संयोग दिवस ३० एप्रिलला उजाडला आहे.यामुळे प्रत्येकांनी वृक्षारोपण करून मानवजातीचा धर्म पाळला पाहिजे.यामुळे ऑक्सिजनची मात्रा वाढेल व मानवजातीचे कल्याण होईल, गुरांना मोठ्या प्रमाणात चारा मिळेल, पशुपक्ष्यांना शुद्ध हवा व सावली मिळेल. यातच आपल्याला अक्षय्य तृतीया,महात्मा बसवेश्वर,भगवान परशुराम यांचे दर्शन घडुन येईल यात दुमत नाही. कारण संपूर्ण वृक्षांच्या जळा-मूळात, फळात, फुलात, पानात व झाडांच्या कणाकणात आपल्याला थोरमहात्म्यांचा, साधुसंतांचा व बसवेश्वर महाराजासह संपूर्ण देवी-देवतांचा वास अवश्य दिसून येईल.

**- रमेश कृष्णराव लांजेवार**

# अक्षय तृतीया-सौभाग्य आणि शुभ परिणामांचा कधीही क्षय

**हिंदू कॅलेंडरच्या मुख्य तारखांपैकी एक म्हणजे अक्षय्य तृतीया. हिंदूंसाठी हा अत्यंत पवित्र दिवस आहे. अक्षय तृतीया वैशाख महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या तृतीयेला साजरी केली जाते. याला अखाती तीज असेही म्हणतात.**

### अक्षय्य तृतीयेचा अर्थ

अक्षय म्हणजे 'जे कधीही संपत नाही' आणि म्हणूनच असे म्हटले जाते की अक्षय्य तृतीया ही अशी तिथी आहे ज्यामध्ये सौभाग्य आणि शुभ परिणामांचा कधीही क्षय होत नाही. या दिवशी केलेले कार्य मनुष्याच्या जीवनात कधीही न संपणारे शुभ फफल देते. म्हणूनच असे म्हटले जाते की या दिवशी एखादी व्यक्ती जिंकल्यानंतरही चांगले कर्म आणि दान करते, त्याचे शुभ परिणाम मोठ्या प्रमाणात मिळतात आणि शुभ परिणामांचा प्रभाव कधीही संपत नाही.

### अक्षय्य तृतीया का साजरी केली जाते?

अक्षय्य तृतीया हा हिंदू धर्मात साजरा केला जाणारा अतिशय पवित्र सण आहे. सर्व हिंदू तो मोठ्या उत्साहाने साजरा करतात. हिंदू धर्मासोबतच अक्षय्य तृतीयेचा दिवस जैन धर्मासाठीही महत्त्वाचा आहे.

### हिंदू श्रद्धा

अखाती तीजमागे अनेक हिंदू श्रद्धा आहेत. काही जण याचा संबंध भगवान विष्णूच्या जन्माशी जोडतात, तर काही जण भगवान श्रीकृष्णाच्या लीलाशी जोडतात. सर्व समजुती श्रद्धेशी संबंधित असण्यासोबतच खूप रोचक आहेत.

१. हा दिवस पृथ्वीचे रक्षक भगवान विष्णू यांना समर्पित आहे. हिंदू धर्माच्या मान्यतेनुसार विष्णूने श्री परशुरामाच्या रूपात पृथ्वीवर अवतार घेतला होता. या दिवशी विष्णू सहाव्यांदा परशुरामाच्या रूपात पृथ्वीवर अवतरले आणि म्हणूनच हा दिवस परशुरामाचा जन्मदिवस म्हणूनही साजरा केला जातो. धार्मिक मान्यतेनुसार, त्रेता आणि द्वापर युगापर्यंत विष्णू पृथ्वीवर चिरंजीवी (अमर) राहिले. परशुराम हे सप्तर्षींपैकी एक ऋषी जमदग्नी आणि रेणुका यांचे पुत्र होते. हे ब्राह्मण कुटुंबात जन्माला आले आणि म्हणूनच अक्षय्य तृतीया आणि परशुराम जयंती सर्व हिंदू मोठ्या थाटामाटात साजरी करतात.

२. दुसऱ्या मान्यतेनुसार त्रेतायुगाच्या प्रारंभी पृथ्वीची सर्वात पवित्र मानली जाणारी गंगा नदी या दिवशी स्वर्गातून पृथ्वीवर आली होती. भगीरथाने गंगा नदी पृथ्वीवर आणली होती. या पवित्र नदीचे पृथ्वीवर आगमन झाल्याने या दिवसाचे पावित्र्य वाढते आणि म्हणूनच या दिवसाचा हिंदूंच्या पवित्र सणात समावेश होतो. या दिवशी पवित्र गंगा नदीत स्नान केल्याने व्यक्तीची पापे नष्ट होतात.

३. हा दिवस माता अन्नपूर्णा, स्वयंपाकघर आणि पाककला (अन्न) ची देवी, यांचा वाढदिवस देखील मानला जातो. अक्षय्य तृतीयेच्या दिवशी आई अन्नपूर्णेचीही पूजा केली जाते आणि भंडारदरा भरून ठेवण्यासाठी आईकडून वरदान मागितले जाते. अन्नपूर्णेच्या पूजेने स्वयंपाकघर आणि जेवणाची चव वाढते.

४. दक्षिणेकडील प्रांतात या दिवसाची वेगळी ओळख आहे. त्यांच्या मते, या दिवशी कुबेर (भगवानाच्या दरबाराचा खजिनदार) यांनी शिवपुरम नावाच्या ठिकाणी त्यांची पूजा करून शिवाला प्रसन्न केले होते. कुबेराच्या तपश्चर्येने प्रसन्न होऊन शिवाने कुबेराला वरदान मागायला सांगितले. कुबेरांनी लक्ष्मीजींकडून आपली संपत्ती व संपत्ती परत मिळवण्यासाठी वरदान मागितले. तेव्हा शंकरजींनी कुबेराला लक्ष्मीची पूजा करण्याचा सल्ला दिला. म्हणूनच तेव्हापासून आजपर्यंत अक्षय्य तृतीयेला लक्ष्मीजींची पूजा केली जाते. लक्ष्मी ही विष्णूची पत्नी आहे, म्हणूनच लक्ष्मीची पूजा करण्यापूर्वी भगवान विष्णूची पूजा केली जाते. दक्षिणेला या दिवशी लक्ष्मी यंत्रमाची पूजा केली जाते, ज्यामध्ये विष्णू, लक्ष्मीजींसोबत कुबेराचेही चित्र असते.




५. महर्षी वेद व्यास यांनी अक्षय्य तृतीयेच्या दिवशी महाभारत लिहिण्यास सुरुवात केली. या दिवशी महाभारतातील युधिष्ठिराला 'अक्षयपत्र' प्राप्त झाले होते. या अक्षयपात्राचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातून अन्न कधीच संपत नाही. या पात्राद्वारे युधिष्ठिर आपल्या राज्यातील गरीब आणि भुकेल्या लोकांना अन्नदान करून मदत करत असे. या श्रद्धेच्या आधारावर या दिवशी केलेले दानाचे पुण्यही अक्षय मानले जाते, म्हणजेच या दिवशी मिळालेले पुण्य कधीही संपत नाही. त्यामुळे वर्षानुवर्षे माणसाचे भाग्य वाढते.

६. अक्षय्य तृतीयेची आणखी एक कथा महाभारतात प्रचलित आहे. या दिवशी दुशासनाने द्रौपदीचा अपमान केला होता. या वस्त्रहरणातून द्रौपदीला वाचवण्यासाठी श्रीकृष्णाने कधीही न संपणारी साडी दान केली.

७. अक्षय्य तृतीयेमागे हिंदूंची आणखी एक रोचक श्रद्धा आहे. श्रीकृष्णाने पृथ्वीवर जन्म घेतला तेव्हा अक्षय्य तृतीयेच्या दिवशी त्यांचा गरीब मित्र सुदामा कृष्णाला भेटायला आला.

कृष्णाला देण्यासाठी सुदामाकडे फफक्त चार तांदळाचे दाणे होते, तेच सुदामाने कृष्णाच्या चरणी अर्पण केले. पण आपला मित्र आणि सर्वांचे हृदय जाणणाऱ्या देवाने सर्व काही समजून घेऊन सुदामाचे दारिद्र्य दूर केले, त्याच्या झोपडीचे महालात रूपांतर केले आणि त्याला सर्व सुविधांनी परिपूर्ण केले. तेव्हापासून अक्षय्य तृतीयेला केलेल्या दानाचे महत्त्व वाढले आहे.

८. भारतातील ओरिसामध्ये अक्षय्य तृतीयेचा दिवस शेतकऱ्यांसाठी शुभ मानला जातो. या दिवसापासून येथील शेतकरी आपल्या शेतात नांगरणी करू लागतात. ओरिसातील जगन्नाथपुरी येथूनही या दिवशी रथयात्रा काढली जाते.

९. वेगवेगळ्या प्रांतात या दिवसाचे स्वतःचे महत्त्व आहे. बंगालमध्ये सर्व व्यापाऱ्यांनी या दिवशी गणेश आणि लक्ष्मीची पूजा करून त्यांचे लेखापरीक्षण पुस्तक सुरू करण्याची प्रथा आहे. त्याला इथे 'हलखता' म्हणतात.

१०. पंजाबमध्येही या दिवसाला खूप महत्त्व आहे. हा दिवस नवीन हंगामाच्या सुरुवातीचा सूचक मानला जातो. या अक्षय्य तृतीयेला ब्रह्म मुहूर्तावर जाट कुटुंबातील पुरुष मंडळी त्यांच्या शेताकडे जातात. त्या रस्त्यावर जितके प्राणी-पक्षी आढळतात, तितकेच ते कापणी आणि पावसासाठी शुभ मानले जाते.

या दिवशी भगवान विष्णू आणि लक्ष्मीच्या पूजेला महत्त्व आहे. या दिवशी भगवान विष्णूची पूजा केली जाते आणि विष्णूला तांदूळ अर्पण केल्याने विशेष फफायदा होतो. पूजा केल्यानंतर त्यांना तुळशीच्या पानांसह अन्न अर्पण केले जाते. सर्व विधी पूर्ण केल्यानंतर देवाची अगरबत्ती लावून आरती केली जाते. उन्हाळ्यात येणारे आंबे आणि चिंच देवाला अर्पण केले जातात आणि वर्षभर चांगले पीक आणि पावसासाठी आशीर्वाद मागितले जातात. अनेक ठिकाणी या दिवशी मातीची भांडी पाण्याने भरली जातात. कच्चा आंबा, चिंच आणि गूळ पाण्यात मिसळून देवतेला अर्पण केले जाते. चांगल्या हेतूने दिलेली प्रत्येक गोष्ट परोपकाराची पुण्य वाटते. या दिवशी तूप, साखर, धान्य, फळे, भाज्या, चिंच, कपडे, सोने, चांदी इत्यादींचे दान करावे.

या दिवशी छोट्या दानाचेही खूप महत्त्व आहे. असे असले तरी, एका रंजक मान्यतेनुसार अक्षय्य तृतीयेला इलेक्ट्रॉनिक्स वस्तू देण्याचेही महत्त्व आहे. या दिवशी अनेक लोक पंखे, कुलर इत्यादी दान करतात किंबहुना हा सण उन्हाळ्याच्या दिवसात येतो, त्यामुळे उन्हापासून बचाव करण्यासाठी उपकरणे दान केल्यास त्याचा फफायदा होतो आणि देणगीदारांना पुण्य प्राप्त होते, असा विश्वास यामागे आहे.

हा दिवस सर्व शुभ कार्यासाठी उत्तम आहे. अक्षय्य तृतीयेला लग्न करणे खूप शुभ मानले जाते. ज्याप्रमाणे या दिवशी केलेल्या दानाचे पुण्य कधीच संपत नाही, त्याचप्रमाणे रोजच्या लग्नातही पती-पत्नीमधील प्रेम कधीच संपत नाही. या दिवशी लग्न झालेले लोक जन्मापर्यंत एकत्र नांदतात. लग्नाव्यतिरिक्त उपनयन सोहळा, घराचे उद्घाटन, नवीन व्यवसाय सुरू करणे, नवीन प्रकल्प सुरू करणे इत्यादी सर्व शुभ कार्ये देखील शुभ मानली जातात. या दिवशी अनेकजण सोने आणि दागिने खरेदी करतात.

या दिवशी व्यवसाय इत्यादी सुरू केल्याने व्यक्तीला सदैव प्रगती मिळते आणि शुभ परिणाम दिवसेंदिवस वाढत जातात. ऋषिकेशच्या या मंदिरात फक्त अक्षय्य तृतीयेलाच होतात विष्णू चरणांचे दर्शन. अक्षय्य तृतीयेची कथा ऐकून विधिपूर्वक पूजा केल्याने भरपूर लाभ मिळतो. या कथेला पुराणातही महत्त्व आहे. जो कोणी ही कथा ऐकतो, पूजा करतो व दानधर्म करतो त्याला सर्व प्रकारचे सुख, धन, ऐश्वर्य, कीर्ती, वैभव प्राप्त होते. या संपत्ती आणि कीर्तीच्या प्राप्तीसाठी वैश समाजातील धर्मदास नावाच्या व्यक्तीने अक्षय्य तृतीयेचे महत्त्व जाणून घेतले.

ही फार जुनी गोष्ट आहे की, धरमदास एका छोट्या गावात

कुटुंबासह राहत होते. ते खूप गरीब होते. आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची त्यांना नेहमीच काळजी असायची. त्यांच्या कुटुंबात अनेक सदस्य होते. धर्मदास हे अतिशय धार्मिक वृत्तीचे व्यक्ती होते. एकदा त्यांनी अक्षय्य तृतीयेला उपवास करण्याचा विचार केला. अक्षय्य तृतीयेच्या दिवशी सकाळी लवकर उठून त्यांनी गंगेत स्नान केले. नंतर पद्धतशीरपणे भगवान विष्णूची पूजा आणि आरती केली. या दिवशी आपल्या क्षमतेनुसार पाण्याची भांडी, पंखे, जव, सत्तू, तांदूळ, मीठ, गहू, गूळ, तूप, दही, सोने, कपडे इत्यादी वस्तू देवाच्या चरणी ठेवून दान केल्या. ही सर्व देणगी पाहून धर्मदास यांच्या कुटुंबीयांनी व त्यांच्या पत्नीने त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले की, जर धरमदास हे सर्व दानधर्मासाठी देतील तर कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा होणार? तरीही धर्मदास आपल्या दानधर्माने आणि पुण्यकर्माने विचलित झाले नाहीत आणि त्यांनी ब्राह्मणांना अनेक प्रकारच्या दान दिल्या.

अट्टल संकेत

छत्रपती संभाजीनगर, बुधवार, दि. ३० एप्रिल २०२५ ४

# शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी यासाठी बळीराजा संघटनेचे धरणे आंदोलन




**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

राज्यात दरवर्षी पावसाचे प्रमाण कमी-अधिक होत असल्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होते. पिके उगवत नसल्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. याशिवाय, शासनाकडून ज्या विविध कल्याणकारी योजना राबवल्या जातात, त्या थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाहीत. त्यामुळे बरेच शेतकरी या योजनांपासून वंचित राहतात. परिणामी, शेती करण्यासाठी शेतकरी बँका किंवा खासगी सावकारांकडून कर्ज घेतात. मात्र उत्पन्न न झाल्यास हे कर्ज फेडणे त्यांच्यासाठी अशक्य बनते आणि अनेक वेळा या आर्थिक तणावातून शेतकरी आत्महत्येस प्रवृत्त होतात.

या पार्श्वभूमीवर गरजवंत शेतकऱ्यांना तातडीने संपूर्ण कर्जमाफी मिळावी, या प्रमुख मागणीसाठी अखिल भारतीय बळीराजा संघटनेच्या वतीने छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. आंदोलन संपल्यानंतर विभागीय आयुक्त दिलीप गावंडे यांना निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात स्पष्ट चेतावणी देण्यात आली की, जर शासनाने लवकरात लवकर संपूर्ण कर्जमाफीसंदर्भात निर्णय घेतला नाही, तर बळीराजा संघटना राज्यभर तीव्र आंदोलन छेडेल. या आंदोलनात बळीराजा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष निवृत्ती डक पाटील, प्रदेशाध्यक्ष शिवाजीराव साळुंके, प्रदेश उपाध्यक्ष जी. के. गाडेकर, मराठवाडा अध्यक्ष प्रभाकर भुसारे, महिला प्रदेशाध्यक्षा अनिता पाटील, मराठवाडा महिला अध्यक्षा सुमित्रा गावंडे, शोभा वाकळे, छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष आबासाहेब भोसले पाटील आदींसह संघटनेचे अनेक पदाधिकारी सहभागी झाले होते.

तसेच राम काका पठाडे, ज्ञानेश्वर काकडे, दिलीप जाधव, शालेय गिरी, दौलत जाधव, बापू लोखंडे, फकीरा आहेर यांचाही आंदोलनात सक्रीय सहभाग होता. आंदोलन शांततेत पार पडले असले, तरी शासनाला कर्जमाफीबाबत तातडीने निर्णय घ्यावा लागेल, असा ठाम इशारा या आंदोलनातून देण्यात आला आहे.

# जैन मंदिर जोहरीवाडा येथे त्रिदिवसीय वर्षी तप पारना महोत्सव



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

आनंदजी कल्यानजी जैन मंदिर जोहरीवाडा तर्फे त्रिदिवसीय वर्षीतप पारना महोत्सवचे आयोजन प्रवर समिति कार्यवाहक, महा मांगलिक प्रदाता,संघ उपकारी गच्छाधीपति प.पु.ग.आ.भ. श्रीमद विजय अभयदेवसूरीजी महाराजा,मार्गदर्शक प.पु.आ.भ. श्रीमद,मोक्षरत्नसुरिश्वरजी म.सा.च्या आशिर्वादाने प.पू. सा.श्री.अर्केदुश्रीजी म.सा.,प.पू.सा. श्री.मुक्तिरसाश्रीजी म.सा., प.पू. सा.श्री. शासन ज्योतिश्रीजी म.सा. यांच्या सानिध्यात वर्षीतप पारना महोत्सव चे आयोजन सोमवार दि.२८.०४.२०२५ रोजी श्री विमलनाथ मंदिर वरुण पूज्य गुरु भगवंत वब वर्षीतप तपस्वींची शोभा यात्रा श्री गोडिजी पार्श्वनाथ जैन मंदिर पर्यंत काढण्यात आली. पश्यात श्री आदिनाथ प्रभु पंचकल्याणक पूजा महिला मंडलतर्फे करण्यात आली. दि.२९.०४.२०२५ सकाळी ०८.३० वा. शिर धर्मेन्द्रभाई पंडित ( मुंबई ) यानी तपवंदानावली हा कार्यक्रम सदर केला. या कार्यक्रमाचा लाभ मातोश्री प्यारी बेन गणेशमल लुंकड़ परिवाराने घेतला.

या कार्यक्रमात श्री श्रेयांश कुमार बनुन मातोश्री लीलावती बेन जेठाबाई मोमाया, श्री चंद्रबेन गुलाबचंद खोना, शौर्य, निशांत, लीना, यश तथा लोढाया परिवार तपस्विना पारना करवण्याचा मान मीळवला. श्री गुरुपूजन चा मान एक सदग्रस्त परिवार हस्ते रमेश भाई मनमंदिर परिवाराने मीळवला. तसेच गुरु भगवंताना शाल ओढ़वन्याचा मान श्री डॉ.उमेशकुमार रूपचंद तातेड परिवाराने श्री.पु. सा.श्री एवं तपस्विना अक्षतने स्वागत करण्याचा मान मातोश्री लीलावती बेन जेठाबाई मोमाया श्री चंद्रबेन गुलाबचंद खोना, शौर्य, निशांत, लीना, यश तथा लोढाया परिवार मीळवला. तपस्विचा बहुमान करण्याचा मान मातोश्री सुशीला देवी चैनकरन संचेती परिवाराणे मीळवला दु.१२.३० वा. श्री चक्र महापूजन चे आयोजन मोमाया परिवारा तर्फे करण्यात आले होते.

या प्रसंगी विधिकार राजुभाई शाह ( मलकापुर ), संगीतकार - दर्शित गादीया व शेकडो भाविक उपस्थित होते.

अक्षय तृतीया दि. ३०.०४.२०२५, बुधवार रोजी सकाळी ७.०० वा. श्री आदिनाथ भगवंताचा अभिषेक, पूजा, आरती चे आयोजन ७.३० वा. नवकारशी स.८.३० वा. श्री अभयमुक्ति एक्टिव ग्रुप तर्फे संस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन सकाळी १०.०० वा. प.पू.सा.श्री. मुक्तिरसाश्रीजी म.सा. च्या प्रशिष्या, प.पू.सा.श्री. परम ार्थरसाश्रीजी म.सा. व प.पू.सा.श्री. तत्वार्थप्रियाश्रीजी म.सा. तसेच सुश्रावक हर्षल अनिल मोमाया, सुश्राविका श्रीमती सरोज बेन, सौ. अर्चना बेन नरेन्द्र गेलडा, सारिका बेन प्रशांतभाई बोरा यांचा वर्षीतप पारना ११.३० ते २.०० वाजे पर्यंत महाप्रसादी दु ३.०० वाजता तपस्वीची सांजी ( भावगीत ) सह कार्यक्रम म.सा.च्या सांसारिक परिवारा तर्फे आयोजित करण्यात आला आहे. उपरोक्त कार्यक्रमास जास्तीत जास्त भाविकानी उपस्थित रहावे असे आव्हान ! श्री आनंदजी कल्यानजी जैन श्वेताम्बर मंदिर ट्रस्ट व अभय मांगलिक मंडल तर्फे करण्यात आले आहे .

# छत्रपती संभाजीनगरात भगवान परशुरामांची जयंती उत्साहात साजरी





छत्रपती संभाजीनगरात भगवान परशुरामांची जयंती मोठ्या धुमधडाक्यात साजरी करण्यात आली. संस्थान गणपतीपासून शोभायात्रेला सुरूवात करण्यात आली.आध्या गौड समाजाच्या महिलांनीही मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. 'शोभायात्रेत सहभागी झालेल्या भक्तांसाठी पाणी, थंडगार मठ्ठा, व नाश्यात्याची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच संभाजीपेठ (औरंगपुरा) येथे शोभायात्रा विसर्जित करण्यात आली.

राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान

# जिल्हाधिकारी कार्यालय व उपविभागीय कार्यालय कन्नड यांना विभागस्तरीय पारितोषिक जाहीर

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियानांतर्गत छत्रपती संभाजीनगर विभागात छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड व उपविभागीय अधिकारी कार्यालय, कन्नड यांना सन २०२४-२५ साठी पारितोषिके जाहीर केली आहेत. विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी आज हे जाहीर केले. छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालयास आधुनिक संकल्पना या श्रेणीत, जिल्हाधिकारी नांदेड कार्यालयास कर्मचारी बदल्या ऑनलाईन पोर्टल मार्फत तर कन्नड उपविभागीय अधिकारी कार्यालयास आधुनिक संकल्पना व व्यवस्थापन या श्रेणीत पुरस्कार जाहीर झाले आहेत. या पुरस्कारासाठी विभागात एकूण २३ प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यातुन ही निवड करण्यात आली असे विभागीय आयुक्तांच्या आदेशात म्हटले आहे.

गेल्या आठवडय़ात कित्येक ठिकाणी तापमानाचा पारा ४५-४६ अंशांवर गेला होता. त्यानंतर वातावरणात अचानक मोठा बदल झाला आहे. अवकाळीचे ढग दाटण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे पुढील दोन-तीन दिवसांत वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस पडू शकतो, असे भाकीत हवामान शास्त्रज्ञांनी केले आहे. यामुळे शेतपिकांचे मोठे नुकसान होण्याची भीती आहे. त्यामुळे राज्यभरातील शेतकरी चिंतेत सापडले आहेत. पुढील दोन-तीन दिवसांत तापमानात घट होईल आणि राज्याच्या अनेक भागांत अवकाळी पाऊस पडेल, असे हवामान अभ्यासकांचे मत आहे.

# जीवनाच्या परीक्षेत यशस्वी व्हायचे असेल तर विद्यार्थ्यांनी संस्कृती,संस्कारासह वाचनक्षम बनले पाहिजे- जिल्हाधिकारी मा.दिलीप स्वामी




**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

म.शि.प्र. मंडळ संचालित देवगिरी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने देवगिरी महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाचे आयोजन दिनांक २४ एप्रिल २०२५ रोजी करण्यात आले. या पदवी वितरण समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी श्री.दिलीप स्वामी उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी देवगिरी महाविद्यालय विकास समितीचे ज्येष्ठ सदस्य श्री पंडितराव हर्षे होते. तर विचारमंचावर म.शि.प्र. मंडळ केंद्रीय कार्यकारिणी सदस्य श्री. त्रिंबकराव पाथ्रीकर, महाविद्यालय विकास समिती सदस्य, डॉ. आदित्य येळीकर, निमंत्रित सदस्य श्री. विवेक जैस्वाल, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर, उपप्राचार्य डॉ.रवी पाटील, डॉ.अपर्णा तावरे, डॉ. गणेश मोहिते या कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. शेखर शिरसाट यांची प्रमुख उपस्थिती होती. पदवी वितरण समारंभाच्या आरंभी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.अशोक तेजनकर यांनी केले. आपल्या प्रास्ताविकपर भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासामध्ये देवगिरी महाविद्यालयाची भूमिका विशद केली. तसेच देवगिरी महाविद्यालय हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पहिले स्वायत्त दर्जा असणारे महाविद्यालय आहे. या स्वायत्त दर्जाच्या माध्यमातून देवगिरी महाविद्यालयामध्ये रोजगाराभिमुख, संशोधन व विकासपुरक अभ्यासक्रम राबविले जातात असे विचार मांडले.

या पदवी वितरण समारंभ प्रसंगी छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी श्री. दिलीप स्वामी यांनी सध्या परिस्थितीमध्ये गुणांची टक्केवारी आणि गुणांचा फुगवटा यामधून विद्यार्थ्यांवर प्रचंड ताण निर्माण होत आहे म्हणून देवगिरी महाविद्यालयामध्ये साहित्य, संस्कृती, कला, क्रीडा, विज्ञान यासंबंधी विशेष लक्ष दिले जाते त्यामधून विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती होते ही महत्त्वाची बाब आहे. आजचा विद्यार्थी हा संस्कार आणि संस्कृती पासून दूर चालला आहे म्हणून विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये आई-वडील आणि गुरुजन यांचे ऐकले पाहिजे. या माध्यमातूनच आजचा विद्यार्थी संस्कारक्षम, आरोग्यक्षम, तंत्रस्नेही याबरोबरच वाचनस्नेही बनला पाहिजे. वाचन संस्कृती वृद्धींगत झाली पाहिजे. पालकांनी पण आपल्या कृतीतून वाचन संस्कृतीची जोपासना केली पाहिजे. खऱ्या अर्थाने जीवनाच्या परीक्षेत यशस्वी व्हायचे असेल तर विद्यार्थ्यांनी संस्कारक्षम व वाचनक्षम बनले पाहिजे.

आपले आई-वडील आणि गुरु यांच्या सल्ल्याने पुढील वाटचाल केली पाहिजे असे विचार व्यक्त करून पदवीधारक विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. अध्यक्षीय भाषणात श्री. पंडितराव हर्षे यांनी देवगिरी महाविद्यालयाचे विद्यार्थी समाजामध्ये वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये आपली भूमिका यशस्वीपणे निभावतील असा विश्वास व्यक्त केला. या पदवी वितरण समारंभामध्ये पदवी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आली.

# महाराष्ट्र राज्य स्थापना दिन; मुख्य शासकीय समारंभ देवगिरी मैदानावर

**छत्रपती संभाजीनगर** - महाराष्ट्र राज्य स्थापना दिनाचा ६६ वा वर्धापन दिनाचा मुख्य शासकीय समारंभ देवगिरी मैदान, पोलीस आयुक्तालय येथे गुरुवार दि.१ मे रोजी सकाळि ८ वा होणार आहे. या सोहळ्यात राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालक मंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते ध्वजारोहण होईल. या सोहळ्यात स्वातंत्र्य सैनिक, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी, पत्रकार, प्रशासकीय अधिकारी- कर्मचारी व नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन विभागीय आयुक्त दिलीप गावडे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे.

# ड्रोन उड्डाणास प्रतिबंध

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे ड्रोन, रिमोट कंट्रोल्ड मायक्रो - लाइट एअरक्राफ्ट, पॅराग्लायडर, पॅरा मोटर्स, हॅण्ड लायडर्स हॉट एअर बलून इ. उडाण क्रियांना पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात दि.२ मे २ जून पर्यंत प्रतिबंध करण्यात येत आहे,असे पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी आदेश निर्गमित केले आहे.

# वेरूळ शिवारात चांगोबा वस्तीत बिबट्याचा खुलेआम वावर; शेतकऱ्यांमध्ये भितीचं वातावरण

**खुलताबाद (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील वेरूळ लेणीच्या पायथ्याशी असलेल्या चांगोबा वस्ती शिवारात रविवारी गट क्रमांक २२ मध्ये पाण्याच्या शोधात आलेला बिबट्या अनेक शेतकऱ्यांना दिसल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पाणीच्या शोधात बिबट्या वेरूळ शिवारातील गट नंबर २ चांगोबा शेती वस्तीकडे येत असल्याच्या घटना सातत्याने वाढत आहेत. उन्हाळ्यात जंगलात पाणी आणि शिकार यांच्या कमतरतेमुळे हे प्रकार घडत असल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे..वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी या बिबट्याचे बंदोबस्त करण्याची मागणी बिबट्याचे दहशत वेरूळ शिवारात चांगोबा वस्तीतील शेतकरी बांधवांनी केली आहे, वनविभागांनी जंगलात जर वन्य प्राण्यांसाठी पाणवठे तयार केले असते,तर अशी प्राणी वस्तीमध्ये शिरकाव केला नसता.त्यामुळे वन विभागाने तातडीने बिबट्याच्या बंदोबस्ताची कार्यवाही करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

**पाण्याच्या शोधात वन्य प्राणी मानवी वस्तीकडे**

सध्या वाढलेल्या उन्हाच्या तीव्रतेमुळे वन्य प्राण्यांना पाण्याची तीव्र गरज भासत आहे. परिणामी,पाण्याच्या शोधात हे प्राणी लोकवस्तीत शिरत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागात भीतीचे वातावरण पसरले वन विभागाने या परिस्थितीकडे गांभीर्याने लक्ष देऊन वन्य प्राण्यांसाठी पाणवठयाच्या व्यवस्था करावी, अशी मागणी होत आहे.

# धर्मादाय सह आयुक्त कार्यालयातील जुने निरुपयोगी साहित्य विक्रीस उपलब्ध

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

येथील धर्मादाय सह आयुक्त कार्यालयातील जुने, निरुपयोगी भांडार साहित्य निर्लेखित करुन विल्हेवाट लावायचे आहे. त्यासाठी हे साहित्य धर्मादाय सह आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बाबा पेट्रोल पंपाजवळ, अदालत रोड छत्रपती संभाजीनगर येथे उपलब्ध आहे. भांडार साहित्य दि.५ मे पर्यंत कार्यालयीन वेळेत (सकाळी १० ते सायंकाळी ६) वाजेपर्यंत पाहता येणार आहे. दिलेल्या कालावधीत साहित्याचे दर या कार्यालयास कळवावे. दर कळिवताना लाकूड, लोखंड व फायबर, रद्दी (पुठ्ठे व कागद) यांचे दर प्रति किलोप्रमाणे व गाडीचे टायर प्रति नगाप्रमाणे दर कळवावे. जास्तीतजास्त दर असणाऱ्या फर्मचा विचार करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. साहित्य निर्लेखन व विक्री करण्याचे सर्व व रद्द करण्याचे सर्व अधिकार या कार्यालयाकडे राखून ठेवण्यात आले आहेत,असे धर्मादाय सह आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय धर्मादाय उप आयुक्त यांनी कळिवले आहे.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

• संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL • मो. 7588166496 • Email : attalsanket2023@gmail.com • RNI No. MAHMAR/2023/87816